# मुंबई विद्यापीठ

परिपत्रक क्र.क्रीडा/ १४/ २०२२ दिनांक २ मार्च, २०२२

प्रति,
प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
मुंबई विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालये.

विषय :- महाविद्यालयांमधील " शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक " पद भरणेबाबत.

महोदय/महोदया,

मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर राज्य क्रीडा व युवा धोरण - २०१२ ची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याकरीता सर्व विद्याशाखेतील संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांनी प्रति विद्यार्थी जिमखाना शुल्क रूपये ४००/- आकारून त्यापैकी १५% रक्कम (प्रति विद्यार्थी रूपये ६०/-) क्रीडा निधी (Annual Sports Contribution) या शिर्षकांतर्गत विद्यापीठात जमा करणे तसेच जिमखाना शुल्काच्या उर्वरीत रक्कमेतून महाविद्यालयामध्ये " शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक " पद भरून त्यांच्या वेतन व इतर भत्ते यासाठी खर्च करण्याबाबतचे आदेश **१) परिपत्रक क्र.क्रीडा समिती/१८ दिनांक ६ ऑगस्ट, २०१४ व २) परिपत्रक क्र.क्रीडा समिती/७२ दिनांक २० नोव्हेंबर, २०१८ नुसार निर्गमीत करण्यात आलेले आहेत. (सदर परिपत्रके सोबत जोडली आहेत.)**

तसेच दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीतील इतिवृत्त व मा. व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ३० डिसेंबर, २०२१ रोजीच्या (बाब क्र.१३) बैठकीत सर्व महाविद्यालयांमध्ये " शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक " पद तात्काळ भरण्याबाबत संबंधीत महाविद्यालयांना कळविण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, महाविद्यालयामध्ये " शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक " पद लवकरात लवकर भरण्यात यावे.

कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ